# आचारसंहिता भंगाचे ५ गुन्हे

नांदेड/प्रतिनिधी

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत आयोगाच्या आदेशानुसार सर्वच उमेदवारांनी आपला खर्च दररोज सादर करण्याचे आदेश आहेत. काही उमेदवारांनी हा खर्च सदर केले नाहीत. अशा उमेदवारांवर निवडणूक अधिकाऱ्यांनी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. यात एआयएमआयएमसह अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे.

शहरातील तरोडा झोन कार्यालयाकडून प्रभाग क्र १-अ यातील अपक्ष उमेदवार गिरगावकर नागनाथ गंगाराम, १-क मधील भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे भेडपल्लेवार रजनी नरसिंगराव, २-अ मधील बहुजन रिपब्लीकन सोशलिस्ट पार्टीचे बनसोडे श्रावण मलहारी, २-अ अपक्ष उमेदवार सोनकांबळे नंदा उत्तमराव, ४-ड मधील एआयएमआयएम पक्षाचे म.वसीमोद्दीन म.मसोउद्दीन या उमेदवारांवर भाग्यनगर पोलीस ठाण्यात भादंवि १७१ (आय) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मनपा निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांनी विहित मुदतीत खर्च सादर न केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध सदरील गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सांगळे व कर्मचारी बालाजी सातपुते करीत आहेत.

देह

ळली

घरा घरातून एकच हुंकार

# राज्य निवडणूक आयुक्त आज नांदेडात

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड** : राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त जे.एस.सहारिया आणि मुख्य सचिव शेखर चत्रे हे मंगळवारी नांदेड दौऱ्यावर येत आहेत. महापालिका निवडणूक आणि ग्रामपंचायत निवडणुकीच्या अनुषंगाने सहारिया यांचा हा दुसरा नांदेड दौरा होणार आहे.

महापालिका निवडणुकीत राज्यात पहिल्यांदाच व्हीव्हीपॅट मशीनचा वापर होत आहे. मनपाच्या प्रभाग २ मध्ये व्हीव्हीपॅट मशीन वापरली जाणार आहे.

विशेष म्हणजे, आगामी काळातील सर्वच निवडणुकांमध्ये या मशीन वापरल्या जाणार असल्याची घोषणाही आयोगाने केली आहे. त्या पार्श्वभूमीवर सहारिया यांच्या नांदेड दौऱ्याकडे बघितले जात आहे.

मंगळवारी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात सहारिया हे महापालिका निवडणूक आणि ग्रामपंचायत निवडणुकीचा आढावा घेणार आहेत.